## – सत्र खटला क्र.५५/२०२२ मधील नि.क्र.५ वरील आदेश –

(घोषित दि. १७/१२/२०२२)

१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदार श्री .शंकर रामराव दबडे, रा. देखमुख मळा, अमरापूर, सांगली यांनी दि.२५/०५/२०२२ रोजी गांव मौजे कुडाळ रेल्वेस्टेशन येथील प्लॅटफॉर्म नं.२ येथे कोचीवल्ली एक्सप्रेस रेल्वे गाडी क्र. २०९३२ चे कोच क्र. अे–२ मध्ये कुडाळ पोलीस ठाणे, गुन्हा रजि.क्र.१०६/२०२२ नुसार भारतीय दंड विधान कलम ३२७,४१७, सह ३४ अन्वये घडलेल्या गुन्हयात आरोपींकडून पोलीसांनी जप्त केलेली रक्कम रुपये ५,००,०००/– (रक्कम रुपये ५००/– मुल्याच्या एकूण नोटांचे १००० नग) ही अर्जदार यांना परत मिळणेकामी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४५१ नुसार दाखल केलेला आहे.

२. अर्जदारांचे म्हणणे असे आहे की , अर्जदार हे सोन्याचे व चांदीचे दागिने विक्रीचा तसेच त्यांना टंच करण्याचा व्यवसाय करतात . अर्जदार व श्री.विलास दिनकर धनावडे हे एकत्रपणे सोन्याचे व चांदीचे दागिने विक्रीचा व त्यांना टंच करण्याचा व्यवसाय करतात. त्यामुळे अर्जदार व विलास धनावडे यांना सोने व चांदीचे दागिने टंच करण्याची मशिन विकत घ्यावयाची असल्याने सदर मशिनची अंदाजे किंमत रक्कम रुपये ४२,००,०००/– रत्नागिरी ते कोचिवली या रेल्वे मधील प्रवासा दरम्यान आरोपींनी चोरुन नेली. त्याबाबत कुडाळ पोलिसांनी सदरहू गुन्हा दाखल करुन तपासकामाचे दरम्यान आरोपींना पकडून त्यांचेकडे चौकशी केली असता त्यांच्याकडे त्या रक्कमेपैंकी रक्कम रुपये ५,००,०००/– आरोपी क्र.३ व ४ यांचे ताब्यातून जप्त केली आहे . सदरची रक्कम कुडाळ पोलिसांकडे गुन्हयाचे कामी मुद्देमाल म्हणून जप्त आहे.

३. अर्जदार यांचे पुढे असे म्हणणे आहे की , अर्जदार व श्री.विलास धनावडे यांनी त्यांच्या व्यवसायातून कायदेशीर मार्गाने कमाविलेली ही रक्कम अर्जदार यांच्या मालकीची आहे. सदर रक्कम त्यांच्याकडे नसल्याने त्यांना त्यांच्या सोन्या , चांदीच्या

व्यवसायाकरिता देवाण–घेवाण करण्यास अडचण येत आहे. त्यामुळे त्यांच्या आर्थिक व्यवहारावर खूप परिणाम झालेला आहे. सदरची रक्कम पोलीस ठाण्यात असल्याने अर्जदार यांचे बरेच आर्थिक नुकसान होत आहे. याकामी केसचा निकाल लागण्यास बराच कालावधी जाणार आहे. त्यामुळे सदर रक्कम पोलीस ठाण्यात तशीच पडून राहिल्यास अर्जदार यांच्या दैनंदिन आर्थिक व्यवहाराची घडी विस्कटणारी आहे. सबब, अर्जदार यांना पैशांचा ताबा दिल्यास अर्जदार या कामी न्यायालय ज्या अटी व शर्तींचे घालेले त्या सर्व अटी शर्तींचे कटाक्षाने पालन करणेस तयार आहे. सबब, अर्जदार यांनी सदर जप्त रक्कम योग्य अटी व शर्तींवर ताब्यात मिळावी, अशी विनंती केली आहे.

४. तपासि अंमलदार यांनी नि.क्र.११ येथे म्हणणे दाखल करुन रक्कम योग्य त्या अटी शर्तींच्या आधारे अर्जदार यांचे ताब्यात देणेकरिता आवश्यक ते आदेश पारित करणेत यावेत अशी त्यांनी विनंती केली.

५. सरकारी अभियोक्ता यांनी नि.क्र.१२ येथे म्हणणे दाखल करुन जप्त रक्कम फिर्यादीच्या बँक खात्यात जमा करण्याचे अटी शर्थींवर अर्जदार यांचे ताब्यात देणेकरिता आवश्यक ते आदेश पारित करणेत यावेत अशी त्यांनी विनंती केली.

६. सदर अर्जास आरोपी क्र.२ तर्फे हरकत नोंदविणेत आलेली आहे.

७. दोन्ही बाजूचा युक्तिवाद ऐकला. कागदपत्रांचे अवलोकन केले. भारतीय पुरावा कायदा कलम २७ चे पंचनाम्याचे अवलोकन करता असे दिसते की , रक्कम रुपये ४,००,०००/– आरोपी क्र.३ कडून व रक्कम रुपये १,००,०००/– आरोपी क्र.४ च्या भावाकडून तपासी अंमलदार यांनी जप्त केलेली आहे . सदरची रक्कम फिर्यादी/अर्जदार यांना देण्यास सरकार पक्षाची कोणतीही हरकत नाही . आरोपींनी जरी अर्जाला हरकत नोंदविलेली असली तरी सदरची रक्क अर्जदारास का देण्यात येवू नये याबाबतचा कोणताही ऊहापोह आरोपींतर्फे करण्यात आलेला नाही. त्यामुळे सदरची हरकत ही केवळ औपचारिकता म्हणून घेण्यात आलेली दिसते. त्यामुळे अर्जातील कथने, सरकार पक्षाची

नाहरकत तसेच भारतीय पुरावा कायदा कलम २७ प्रमाणे केलेला पंचनामा यांचा एकत्रीत विचार करता सदरची रक्कम परत देण्यास कोणतीही अडचण असल्याचे दिसत नाही . परिणामी, खालील प्रमाणे आदेश पारित करणेत येतो.

**– आदेश –**

१. अर्ज खालील प्रमाणे मंजूर करणेत येत आहे.

२. कुडाळ पोलीस ठाणे, गुन्हा रजि.क्र.१०६/२०२२, भारतीय दंड विधान कलम ३२७, ४१७, सह ३४ अन्वये आरोपींकडून पोलीसांनी जप्त केलेली रक्कम रुपये ५,००,०००/– (रककम रुपये ५००/– मुल्याच्या एकूण नोटांचे १००० नग) ही अर्जदार श्री.शंकर रामराव दबडे रा.देशमुख मळा, अमरापूर, जि.सांगली यांना रक्कम रुपये ७,००,०००/– (रक्कम रुपये सात लाख मात्र) इतक्या रक्कमेच्या बंधपत्रावर खालील नमूद अटीस अधीन राहून परत करण्यात यावी.

अ) तपासी अंमलदार यांनी अर्जदार याचे ताब्यात रककम देताना अर्जदारांसोबत रककमेचे फोटो अर्जदारांच्या खर्चाने काढावेत. तसेच सदर नोटांचे अनुक्रम नंबर स्वतंत्रपणे नमूद करुन ठेवावेत.

३. अर्जदार यांनी त्यांच्या कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेचा खाते क्रमांक देवून त्याबाबतची बँक पासबुकची झेरॉक्स प्रत त्वरित दाखल करावी. सदरील रक्कम ही तपासी अंमलदार यांनी अर्जदार यांचे खात्यात , बंधपत्र स्वीकारल्या नंतर , परस्पर वर्ग करणेत यावी.

४. बंधपत्र केसच्या अंतिम हुकूमास अधीन राहील.

५. संबंधित पोलीस ठाणे यांना आदेशाची प्रत पाठविणेत यावी.

Digitally signed by SANIKA SATISH JOSHI
Date: 2022.12.26 11:35:48 +0530

दिनांक –१७/१२/२०२२ (श्रीमती सानिका एस.जोशी)
सिंधुदुर्ग – ओरोस. अतिरिक्त सत्र न्यायाधीश
सिंधुदुर्ग ओरोस.